दै. वतनवाला दि. 17.10.25.

# अवैध वाळू वाहतूक प्रकरणात माळाकोळी पोलिसांची मोठी कारवाई; ६२ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

## सपोनि महेश मुळीक यांच्या कारवाईचे पोलीस अधीक्षकांनी केले कौतुक



**लोहा (प्रतिनिधी)**

तालुक्यातील माळाकोळी पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी दोन टिपर वाहनासह एकूण ६२ लाख ५० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. आहे. ही कारवाई नांदेड जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली माळाकोळी पोलिस ठाण्याच्या पथकाने केली.माळाकोळी पोलीस स्टेशनच्या या कारवाईबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.माळाकोळी पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार मिळालेल्या माहितीनुसार,माळाकोळी पोलीस ठाण्यात गु.र.नं.१८३/२०२५ व १८४/२०२५ अंतर्गत कलम ३०३ (२) भा.न्या.सं.सह कलम ४७(७),४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी ऑपरेशन वाहतुक, साठवणुक करणारे ईसमावर कार्यवाही करण्याचे सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले होते.

त्याअनुषंगाने दि. १५ आक्टोबर रोजी पोलीस ठाणे माळाकोळी येथील पोलीस अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग कामी शासकीय वाहना,ने रवाना होऊन पेट्रोलींग करीत असताना पेट्रोलींग दरम्यान खेडकरवाडी पुलाजवळ रोडवर वेळ ००.४५ वाजताचे सुमारास दोन हायवा टिप्पर लोहा कडुन माळाकोळी कडे येत असल्याची माहिती मिळाल्याने दोन्ही हायवा टिप्पर

गाव पत्ता विचारुन वाहनातील वाळु परवाना बाबत विचारपुस केली असता त्यांनी परवाना नसल्याचे सांगीतले वरुन १. एक टाटा कंपनीचा हायवा टिप्पर क्रमांक एम एच-२६-बी ई-९९०३ मध्ये अंदाजे ५ ब्रास वाळु किंमती २५ हजार रुपये व टिप्परची किंमती अंदाजे ३० लाख असा ३० जाख २५ हजार रुपयेचा,०२. एक टाटा कंपनीचा हायवा टिप्पर क्रमांक एम एच-२६-सी एच -२०९८ मध्ये अंदाजे ५ ब्रास वाळु किंमती २५ हजार रुपये व टिप्परची किंमती अंदाजे ३२ लाख असा ३२

६२ लाख २५ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन आरोपी १.राजु शिवाजी राठोड, वय ३३ वर्षे रा.घना नाईक तांडा उम्रज ता. कंधार २. बालाजी दासु पवार, वय ४० वर्षे रा. रमणा तांडा ता.लोहा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड डॉ. अश्विनी जगताप, उप विभागीय पोलीस अधिकारी उप विभाग कंधार यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हा उघडकीस आणणारे माळाकोळी पोलिस स्टेशन चे सपोनि महेश ज्ञा. मुळीक,बालाजी गंगाधर रेडी चामवाड, श्रेणी पोलीस उप निरीक्षक,पोलीस अंमलदार हनमंत बोंबले, शरदचंद्र चावरे, देवीदास भुत्तेवाड यांनी कारवाई पार पाडली.

पोलीस स्टेशन माळाकोळी येथील सहा.पोलिस निरिक्षक महेश मुळीक व अंमलदार आदींनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल पोलीस अधीक्षक यांनी त्यांचे कौतुक केले आहे.